महाराष्ट्र शासन
जिल्हा समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद बीड
Email Id- dswo.zpbid@gmail.com

जा.क्र./जि.प.बी/सकवि/दिव्यांग सुविधा /२०१९-२० / /    दिनांक- ३०/०३/२०२०

प्रति,
**गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती (सर्व)
जिल्हा बीड

**विषय :** संचारबंदीच्या काळात हालचाल न करू शकणाऱ्या दिव्यांगांना सुविधाबाबत..

**संदर्भ :**मा.आयुक्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय म.रा.पुणे यांचे पत्र जा क्रं.१०११ दि.२६.०३.२०२०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, करोना विषाणुच्या संकटावर मात करण्यासाठी शासनाने संचार बंदीची घोषणा केली आहे.या संचार बंदीच्या कालावधीत दिव्यांग व्यक्तीसाठी खालील उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

१. **जीवनावश्यक वस्तुंचे कीट** - लॉकडावुन कालावधी केंद्र शासनाने २१ दिवसाचा केल्याने दिव्यांग व्यक्तींना ( हालचाल न करू शकणाऱ्या) रेशन दुकानातुन एक महीन्याचे जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करणे( धान्य ,कडधान्य ,डाळी ,तेल, तांदूळ इ.) या साठी दिव्यांग व्यक्ती / नातेवाईक यांना तात्काळ ( विना रांग) रेशन द्यावे.
२. **आरोग्यासाठी आवश्यक साहित्य** - ज्या दिव्यांग व्यक्ती अति / तीव्र अपंगत्व / अंथरुणाला खीळलेल्या आहेत त्यांना सॅनीटायझर, मास्क ,रूमाल ,डेटॉल ,फिनेल इ.बाबी त्यांच्या निधीतुन पुरवाव्यात .
३. **कम्युनिटी किचन** - जेथे शासन वा स्वंयसेवी संस्था द्वारा कम्युनिटी किचन सुरू असेल तेथे गरजु दिव्यांगाना घरपोच जेवण/ नाष्टा /डबे पुरवावेत.
४. राष्ट्रीयकृत बँका पतसंस्था नागरी / शहरी बँकामधुन दिव्यांगाना व त्यांच्या कुटूंबीयांना रांगेत न थांबवता तात्काळ सेवा मिळण्यासाठी संबंधीताना सुचना द्याव्यात.
५. दिव्यांग व्यक्तीस आरोग्य विषयक सेवा आवश्यक असल्यास संबंधीतांना सहकार्य मिळुन द्यावे
६. मनोरूग्ण बेवारस व निरासरीत दिव्यांगाना बालगृह/बेघर निवारा केंद्र /वृद्धाश्रम येथे राहण्याची सोय उपलब्ध करून द्यावी.
७. दिव्यांग व्यक्तीना देण्यात येणारी पुढील महीन्याची पेन्शन ॲडव्हान्स मिळणेसाठी संबंधीत विभागास सुचित करावे.
८. दिव्यांगाच्या मदतीकरीता तालुका स्तरावर टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून त्यास प्रसीद्धी द्यावी .

उपरोक्त सर्व बाबी अनुषंगाणे दिव्यांगाना आपत्कालीन परिस्थीतीत सर्व सोयी सुविधा उपलब्ध होतील याची आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. या संदर्भात काही प्रश्न उद्भवल्यास श्री. आर.एच. एडके (जिल्हा समाजकल्याण अधिकारी ) यांचे भ्रमणध्वणी क्रं. **९८६७८१०६००** यावर संपर्क साधावा.

अजित कुंभार (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,बीड.**

**प्रतीलीपी माहितीस्तव:**

१. मा.विभागिय आयुक्त, विभागीय कार्यालय ,औरंगाबाद
२. मा. आयुक्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय म.रा.पुणे
३. मा. जिल्हाधिकारी जिल्हा बीड.
4. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि.प.बीड - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

— sd —
अजित कुंभार (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,बीड.**



Scanned by CamScanner